Publication: Punyanagari
Date: 4/5/2019
Page: 1
Column: 1-3

पुण्य नगरी
मुंबई । शनिवार, ४ मे २०१९

# गोराईतील आदिवासी पाडे प्रकाशमान

। मुंबई : बोरिवलीसारख्या पश्चिम उपनगरातील झगमग असणाऱ्या विभागापासून अवघ्या काही मिनिटांवर असणाऱ्या गोराईतील झामजड पाडा गेले ७० वर्ष विजेच्या मूलभूत हक्कापासून वंचित होता. अखेर ७० वर्षांच्या प्रतीक्षेनंतर अदानी इलेक्ट्रीसिटीच्या माध्यमातून गोराईतील आदिवासी पाडे पहिल्यांदाच प्रकाशमान करण्यात आले आहे. गेले आठवड्याभरात झामजड पाड्यात वायरी टाकण्याचे काम सुरू करण्यात आले होते.

अदानी समूहाकडून गेले आठवडाभर वायरी टाकण्याचे काम सुरू केल्यापासून आपली घरे प्रकाशमान होतील, त्यामुळे सर्व वयोगटांतील स्थानिकांना आनंद झाला होता. या कुटुंबांना लवकरात लवकर वीज सेवेचा आनंद घेता येईल याची खातरजमा अदानीच्या टीमने केली होती. ३ मे रोजी पहिल्यांदा येथे विजेचा दिवा सुरू झाला तेव्हा ग्रामस्थांनी एकत्र नाचत, गात हा आनंद साजरा केला. गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर आलेली झळाळी पाहणे अत्यंत समाधानकारक अनुभव होता, असे सांगत ग्राहक केंद्री संस्था म्हणून आमच्या सर्व ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा मिळेल, यासाठी प्रयत्न करत असल्याचे एईएमएलकडून सांगण्यात आले.



## अदानी इलेक्ट्रीसिटीकडून आठवड्याभरात काम पूर्ण

शहरापासून अवघ्या २० किमी अंतरावर एका छोट्या डोंगरावर असलेला झामजड पाडा मागील १० वर्षे प्रयत्नशील आहे. विजेचे काम पूर्ण झाल्यामुळे आता हे गाव शहराच्या अधिक नजीक आले आहे. हे शहर त्यांना बेटाच्या पलीकडे असलेले चमकणारे शहर वाटत होते. इथली मुले रात्रीही दिव्याच्या प्रकाशात अभ्यास करू शकतील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.